# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रु. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## साई चरणी 18.84 लाखांची चांदीची छत्री अर्पण

**शिर्डी (प्रतिनिधी) :** श्री गणेश चतुर्थीच्या पवित्र मुहूर्तावर अमेरिका स्थित साईभक्त के. चंद्रशेखर यांनी साईबाबांच्या चरणी ०८ किलो ९३३ ग्रॅम वजनाची शुद्ध सोन्याचा मुलामा दिलेली चांदीची छत्री भक्तिभावाने अर्पण केली. या छत्रीचे देणगी मूल्य १८ लाख ८४ हजार ८६३ इतके आहे. अर्पण करण्यात आलेली छत्री आज श्री साईबाबांच्या समाधी मंदिरातील मूर्तीवर माध्यान्ह आरतीपूर्वी प्रतिष्ठापित करण्यात आली. यावेळी संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साईभक्त के. चंद्रशेखर यांचा सत्कार केला.

## व्हेनेझुएलाच्या धर्तीवर इराणच्या तेलसंपत्तीवर नियंत्रण मिळवणार

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी एका वक्तव्यातून खळबळ उडवून दिली आहे. युद्ध संपल्यानंतरही इराणच्या आसपास अमेरिकेची लष्करी उपस्थिती कायम राहू शकते आणि व्हेनेझुएलाप्रमाणे इराणच्या तेलसंपत्तीवर नियंत्रण ठेवले जाऊ शकते, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.आयर्लंडमधील आयरिश ओपन गोल्फ स्पर्धेदरम्यान बोलताना ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, इराणसोबतचा संघर्ष नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांच्या आसपास किंवा त्याआधी संपू शकतो.

## थोडक्यात वार्ता

### पिसाळलेल्या कुत्र्याने चिमुकली सह नागरिकांना घेतला चावा

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी:-** बनवस येथे पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घातल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून एका तीन वर्षाच्या चिमुरडीवर हल्ला करून जखमी केले परसरातील नागरिकांनाही चावा घेतल्याची घटना दिनांक 14 सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी घडली जखमी झालेल्या चिमुकलीवर ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचार सुरू असून नागरिकांमध्ये व पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातील पालक व नागरिक आपापल्या बालकांची अधिक काळजी घेत असल्याचे दिसून येत असून बनवस गावात गेल्या काही दिवसापासून संख्या फार वाढली असून गल्लीबोळा मध्ये शाळेच्या जवळ वस्तीमध्ये मनोवस्तीमध्ये मोकाट कुत्र्याचे टोळके जमावाने फिरत असल्याने लहान मुले महिला ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षितेचा प्रश्न उपस्थित झाला असून त्याच्याच एका पिसाळलेल्या कुत्र्याने नागरिकांना चावा घेतल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण अधिकच वाढले आहेत खेळण्यासाठी पाठवताना शाळेमध्ये पाठवताना पालकांना विशेष खबरदारी घ्यावी लागत आहे भविष्यात एखादी गंभीर घटना घडू नये यासाठी मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांच्या तातडीने बंदोबस्त करण्याची गरज आहे अशी मागणी समस्त ग्रामस्थांनी परिसरातील नागरिकांनी केली .

### नाशिक पोलिस सज्ज ! तब्बल '402' गुन्हेगार हद्दपार

**नाशिक:** आज घरोघरी गणरायाचे आगमन होणार आहे. तर अनेक मंडळांच्या गणपतीचे आगमन मोठ्या थाटामाटात झाले आहे. गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित आणि निर्विघ्न वातावरणात पार पडावा यासाठी आता नाशिक पोलीस देखील सज्ज झाले आहे. शहरातील सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त संदिप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक शहर पोलीस आयुक्तालयामार्फत व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे नाशिक पोलिसांकडून कुलही स्वरूपाचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. उत्सवाच्या कालावधीत कोणत्याही व्यक्तीकडून शांततेचा भंग, सार्वजनिक उपद्रव अथवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये, यासाठी हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. परिमंडळ एक आणि दोन अंतर्गत ४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. त्यांना २७ सप्टेंबरपर्यंत शहर परिसरात वास्तव्यास राहण्यास मनाई करण्यात आली आहे. परिमंडळ एक अंतर्गत १२७, तर परिमंडळ दोन अंतर्गत २७५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ एक अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे - आडगाव ०७, पंचवटी २२, म्हसरूळ १०, भद्रकाली २४, सरकारवाडा ११, गंगापूर २२ आणि मुंबईनाका ३१, अशी परिमंडळ एकमध्ये एकूण १२७ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. पोलीस उपायुक्त किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ दोन अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे - अंबड ४०, सातपूर ५३, इंदिरानगर ३६, एमआयडीसी २५, नाशिकरोड ४२, उपनगर ४६ आणि देवळाली कॅम्प ३३, अशी परिमंडळ दोनमध्ये एकूण २७५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

# फर्दापूरमध्ये शिक्षणाचा बाजार' विद्यार्थ्यांच्या भविष्याची होळी शाळेच्या बाबू आणि मुख्याध्यापकांच्या मनमानीमुळे पोरांचे आयुष्य टांगणीला

हिंदू प्रकाशवार्ता : शेख हक्कानी

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर विद्येचे माहेरघर म्हणवल्या जाणाऱ्या शाळेतच जर विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी रशियन रूलेट खेळला जात असेल तर न्याय मागायचा तरी कुणाकडे फर्दापूरमधील माणिकराव पालोदकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा' अत्यंत भोंगळ ढेपाळलेला आणि गुन्हेगारी स्वरूपाचा संतापजनक कारभार चव्हाट्यावर आला आहे जन्म प्रमाणपत्र आधार कार्ड आणि हॉल तिकीटमध्ये नावे अगदी लख्ख असतानाही बोर्डाच्या कागदपत्रांवर विद्यार्थ्यांच्या नावांचा अक्षरश राडा करून ठेवला आहे आमच्या पोरांच्या भविष्याशी खेळण्याचा मक्ता तुम्हाला दिला कुणी असा जळजळीत आणि खणखणीत सवाल आता फर्दापूरची जनता थेट प्रशासनाच्या तोंडावर विचारत आहे

हॉल तिकिट बरोबर मग मार्कशीटवर घोळ कसा दोन सख्ख्या भावांचा धक्कादायक प्रकार

या शाळेच्या अंधाधुंद कारभाराचा सर्वात धक्कादायक पुरावा म्हणजे एकाच कुटुंबातील दोन सख्ख्या भावांचा प्रकार एका मुलाने दहावी तर दुसऱ्याने नुकतीच बारावी पास केली या दोन्ही मुलांच्या जन्मप्रमाणपत्रावर नावे बरोबर आहेत आधार कार्डवर अचूक आहेत आणि विशेष म्हणजे परीक्षेला बसताना बोर्डाकडून आलेल्या हॉल तिकिट वरही नावे एकदम बरोबर छापून आली होती मग निकालानंतर शाळेने दिलेल्या टीसी आणि बोर्डाच्या मार्कशीटवर नावात अचानक बदल झालाच कसा हॉल तिकिट बरोबर असताना मार्कशीट आणि टीसीवर घोळ करणारी ही कोणती जादुई यंत्रणा' शाळेकडे आहे हा सरळसरळ शाळेच्या मुजोर लिपिकाचा आणि डोळेझाक करणाऱ्या मुख्याध्यापकांचा नाकर्तेपणा आहे

बोर्ड आणि शाळेला मूळ डेटा बदलण्याचा हक्क दिला कुणी

सर्वात मोठा आणि संतापजनक प्रश्न हा आहे की विद्यार्थ्यांचे जन्म प्रमाणपत्र आणि आधार कार्ड हे शासनाचे अधिकृत पुरावे असताना शाळेला किंवा बोर्डाला विद्यार्थ्याचा मूळ डेटा नाव जन्मतारीख परस्पर बदलण्याचा हक्क आणि अधिकार दिला कुणी



शाळेतील लिपिक जुनेद बाबू शाह डोळ्यांवर पैशांची पट्टी बांधून फॉर्म भरत होते की मुख्याध्यापकांनी अर्थ पूर्ण तडजोड करत न बघताच सह्या ठोकल्या विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे कचऱ्याच्या टोपलीत फेकून स्वत च्या मनाने डेटा बदलण्याचा हा अनाधिकृत अधिकार' शाळेला मिळाला कुठून हा केवळ निष्काळजीपणा नाही तर यामागे विद्यार्थ्यांकडून दुरुस्तीच्या नावाखाली पैसे उकळण्याचे मोठे रॅकेट तर चालवले जात नाही ना अशी दाट शंका आता व्यक्त होत आहे

गोरगरीब पालकांच्या पोटावर लाथ

या शाळेत शिकणारी बहुतांश मुले ही हातावर पोट असणाऱ्या ऊन पावसात राबणाऱ्या शेतकरी आणि मजुरांची आहेत एका दिवसाची मजुरी बुडाली तर ज्यांच्या घरात चूल पेटत नाही त्या गोरगरीब पालकांनी आता शाळेचे आणि बोर्डाचे उंबरठे झिजवायचे का शाळेतील कर्मचाऱ्यांच्या मस्तीमुळे आणि मुख्याध्यापकांच्या भोंगळ कारभारामुळे पालकांनी आर्थिक भुर्दंड आणि मानसिक त्रास का सहन करायचा आम्ही रक्ताचं पाणी करून पोरांना शिकवायचं आणि तुम्ही एका झटक्यात त्यांचं आयुष्य उद्ध्वस्त करायचं असा आर्त टाहो आज फर्दापूरचे पालक फोडत आहेत

प्रशासनाची मिलीभगत की डोळ्यांवर कातडे

एका विद्यार्थ्याच्या नावात चूक झाली तर समजू शकतो पण जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या नावात असा भयंकर घोळ असेल तर हा एक मोठा स्कॅम आहे शिक्षण विभागाचे अधिकारी काय गांधारीच्या भूमिकेत आहेत का या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी अधिकाऱ्यांना नक्की कोणाच्या आशीर्वादाची गरज आहे की सर्वांचे हात एकाच ताटात आहेत

चूक शाळेची फास विद्यार्थ्यांच्या गळ्याला

नावात बदल झाल्यामुळे उद्या या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळणार नाही जातीचा दाखला अडकेल बँक खाती उघडता येणार नाहीत आणि नोकरीच्या वेळीही हीच कागदपत्रे त्यांचा गळा घोटतील शाळेने केलेल्या या भयंकर चुकीमुळे विद्यार्थ्यांचे संपूर्ण आयुष्य मातीत मिसळू शकते या बरबाद झालेल्या आयुष्याची भरपाई कोण देणार निवृत्तीच्या उंबरठ्यावर असणारे ते मुख्याध्यापक की तो बेजबाबदार लिपिक जुनेद शाह

आता विनंती नाही थेट न्यायालयाचे दरवाजे ठोकणार

फर्दापूरकरांचा संयम आता सुटला आहे चुका तातडीने दुरुस्त करा आणि ज्याने हा घोळ घातलाय त्या लिपिक आणि त्याला पाठीशी घालणाऱ्या मुख्याध्यापकांवर तात्काळ निलंबनाची व फौजदारी कारवाई करा अशी आक्रमक मागणी पालकांकडून होत आहे जर येत्या काही दिवसांत यावर तोडगा निघाला नाही तर विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी केवळ रस्त्यावर उतरून चक्काजाम होणार नाही तर या बेजबाबदार मुख्याध्यापक आणि क्लार्कला थेट कोर्टात खेचून आम्ही 'न्यायालयाचे दरवाजे ठोकणार असा सणसणीत आणि अंतिम इशारा संतप्त पालकांनी दिला आहे

फर्दापूरचा प्रशासनाला थेट आणि सणसणीत इशारा

शाळा किंवा बोर्डाला आमचा अधिकृत डेटा बदलण्याचा अधिकार कुणी दिला कागदपत्रांतील हा भयंकर घोळ तातडीने दुरुस्त करणार की विद्यार्थ्यांच्या भविष्याची होळी होताना पाहणार मुख्याध्यापक आणि लिपिकावर तात्काळ कारवाई करा अन्यथा कोर्टाची पायरी चढल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही आता फक्त उत्तर नको, कारवाई हवी

# वाजत-गाजत, अपूर्व उत्साहात गणरायाचे स्वागत!

## 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने शहर दुमदुमले; सार्वजनिक मंडळांसह घरोघरी 'श्री'ची प्रतिष्ठापना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गुलालाची मुक्तहस्ते उधळण, बॅण्डबाजासह ढोल-ताशांचा दणदणाट आणि 'गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया...'च्या जयघोषात सोमवारी शहरात गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. सार्वजनिक गणेश मंडळांसह घरोघरी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत 'श्री'ची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशभक्तांच्या उत्साहाने शहरातील विविध भाग

गणेश चतुर्थीनिमित्त सकाळपासूनच गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. ढोल-ताशांच्या गजरात 'मंगलमूर्ती मोरया', 'एक-दोन-तीन-चार, गणपतीचा जयजयकार', 'आले रे आले, गणपती आले' अशा घोषणांनी परिसर निनादून गेला. सहकुटुंब आणि मित्रपरिवारासह नागरिक गणेशमूर्ती खरेदीसाठी बाहेर पडले होते. बालगोपाळांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्याच चेहऱ्यावर गणरायाच्या आगमनाचा आनंद दिसून आला.

बाजारपेठांमध्ये दिवसभर गर्दी

गेल्या आठवडाभरापासून शहरात गणरायाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू होती. गणेश चतुर्थीच्या दिवशी औरंगपुरा, निराला बाजार, गुलमंडी, मच्छली खडक, केळीबाजार, शहागंज, सिटीचौक, जवाहर कॉलनी, गारखेडा, टीव्ही सेंटर, छावणी-बेगमपुरा, मिटमिटा-पडेगाव, मुकुंदवाडी-चिकलठाणा आदी भागांत गणेशमूर्ती खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. बाजारपेठांमध्ये दिवसभर ग्राहकांची वर्दळ सुरू होती.





जिल्हा परिषद मैदान, औरंगपुरा, गुलमंडी, पैठणगेट, टीव्ही सेंटर, शिवाजीनगर, गारखेडा, गजानन मंदिर, जयभवानीनगर चौक, सिडको चौक, हडको चौक, गुरुगोविंदसिंगपुरा, रेल्वेस्टेशन, सेव्हनहिल आणि जालना रोड परिसरात गणेशमूर्ती घेण्यासाठी नागरिकांची गर्दी उसळली होती. आवडती मूर्ती खरेदी केल्यानंतर कुणी डोक्यावर, कुणी दुचाकीवर, तर कुणी हातगाडी आणि चारचाकीतून बाप्पांना घरी घेऊन जात होते.

शाडू, लाल मातीच्या मूर्तींना पसंती

यंदा पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्तींना अनेक गणेशभक्तांनी पसंती दिली. नागपूरहून आणलेल्या लाल मातीच्या सुबक आणि आकर्षक मूर्तीही भक्तांचे लक्ष वेधून घेत होत्या. तुलनेने किंमत अधिक असतानाही अनेकांनी पीओपीऐवजी शाडू आणि लाल मातीच्या मूर्ती खरेदी केल्या.

खड्डे, चिखलातून गणरायांचा प्रवास

गणरायाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी दरवर्षी महापालिकेकडून पॅचवर्क केले जाते. मात्र, यंदा अनेक भागांतील खड्डे कायम राहिल्याने गणेशभक्तांना अडचणींचा सामना करावा लागला. शनिवारी आणि रविवारी झालेल्या पावसामुळे काही मिरवणूक मार्गांवर पाणी साचले होते. खड्डे, चिखल आणि साचलेल्या पाण्यातून गणरायांना घेऊन जाण्याची वेळ आल्याने गणेशभक्तांनी नाराजी व्यक्त केली.

श्रीसंस्थान गणपतीची स्थापना

शहराचे ग्रामदैवत असलेल्या राजा बाजार येथील श्रीसंस्थान गणपती मंदिरात गणेशमूर्तीची स्थापना करून गणेशोत्सवाला सुरुवात झाली. यावेळी आजी-माजी लोकप्रतिनिधी, संस्थानचे पदाधिकारी आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरतीनंतर गणेशोत्सवातील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. संस्थान गणपती मंदिरातर्फे यंदाही दररोज गणपती अथर्वशीर्ष पठणाची परंपरा कायम ठेवण्यात येणार आहे.

मानाच्या गणपतींचे थाटात आगमन

शहरातील मानाचे गणपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुवार फल्ली, धावणी मोहल्ला, राजा बाजार, दिवाण देवडी, खडकेश्वर, खोकडपुरा, दानाबाजार, पानदरीबा, नारळीबाग, औरंगपुरा, पैठणगेट, नगारखाना गल्ली, चौराहा, कोकणवाडी, पदमपुरा, गारखेडा, गजानन मंदिर, सिडको-हडको, बालाजीनगर, शिवाजीनगर, सातारा-देवळाई, पडेगाव-मिटमिटा आणि चिकलठाणा आदी भागांत मानाच्या गणपतींचे थाटात आगमन झाले. रात्री उशिरापर्यंत शहरात ढोल-ताशांचा गजर आणि गणरायाच्या जयघोषाचा जल्लोष सुरू होता.

# सुहागन येथील शेतकऱ्यांची गळफास आत्महत्या

## मयताच्या खिशात आढळलीं चिट्ठी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :-** पूर्णा तालुक्यातील सुहागन येथील शेतकऱ्याने मराठा आरक्षणाचा प्रश्न न सुटल्यास मनोज रंगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर नैराश्य होऊन सुहागन येथील 45 वर्षे शेतकऱ्याने आपल्या शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे सदरी आत्महत्या करणे शेतकऱ्याचे नाव गणेश साहेबराव भोसले वय 45 वर्ष राहणार सुहागन तालुका पूर्णा असे आहे.

मिळालेला अधिक माहितीनुसार 13 सप्टेंबर रोजी हे आपल्या शेतात गेले होते परंतु सायंकाळीपाच पंधरा वाजेच्या सुमारास शेतातील आखाड्यात असलेल्या लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला सदरील घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन खाली उतरण्यात आला त्यावेळी त्यांच्या खिशात एक चिट्ठी आढळून आली मयत गणेश भोसले यांच्या खिशात सापडलेल्या चिठ्ठी मध्ये मजकूर अशाप्रकारे लिहिला होता मनोज दादा जरांगे पाटील हे उपोषणाला बसले असल्यामुळे मराठा आरक्षण मिळत नाही म्हणून मी आत्महत्या करत आहे असा उल्लेख करण्यात आला होता

या घटनेमुळे सुहागन व तालुक्यातील परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात असून याप्रकरणी मृत गणेश भोसले यांचे मेहुणे विनोद लिंबाजी देवरे राहणार थोरावा तालुका वसमत यांनी दिलेल्या माहितीवरून पूर्णा पोलीस ठाण्यात अकस्मात मूर्तीची नोंद करण्यात आली असून पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण पोलीस तपास करत असून या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये खळबळ माजली अनेक शेतकरी चिंता ग्रस्त आहेत.

## गौताळा कमानीजवळ दुचाकीचा अपघात

**कन्नड :** कन्नड-पिशोर मार्गावरील गौताळा कमानीजवळील चंदन नाला परिसरात दुचाकीचा अपघात होऊन किरण काळे वय ३० वर्षे (रा. धामणी) हे जखमी झाले. किरण काळे हे दुचाकी क्रमांक एमएच २० एफए ७७०७ वरून कन्नडहून पिशोरच्या दिशेने जात असताना हा अपघात झाला.अपघाताची माहिती मिळताच पोलिस हेडकॉन्स्टेबल राजकुमार कुकलारे व पोलिस अंमलदार विशाल लोंढे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमी काळे यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

## "शाल जोडे"




# माय मरो पण मावशी जगो! बरोबर ना फडणवीस साहेब

## मराठीच्या मुद्यावरुन अंबादास दानवेंचा मुख्यमंत्र्यांना खोचक टोला

**मुंबई :** देशातील सर्वच भाषा खूप संदुर आहेत. मराठी भाषा माझी आई आहे तर हिंदी भाषा माझी मावशी आहे. आईसोबत मावशीचाही सन्मान आहे, असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी खोचक प्रतिक्रिया दिली आहे. मराठीत एक म्हण आहे. माय मरो पण मावशी जगो..! बरोबर ना फडणवीस साहेब असं वक्तव्य अंबादास दानवे यांनी करत मुख्यमंत्र्यांना टोला लगावलाय.

आज नवी मुंबईतील वाशी या ठिकाणी सिडको प्रदर्शन सेंटरला हिंदी दिवस आणि हिंदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला देशाचे गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मातृभाषा शिकलीच पाहिजे, याचा समावेश नव्या शिक्षण धोरणातही केला गेला आहे, मातृभाषेसोबतच इतर एक भाषा शिकण्याचा समावेश त्यात आहे असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मराठी ही माझी आई आहे, आणि देशातील इतर भाषा मावशी सारख्या आहेत. आईचा गौरव करताना मावशांचाही सन्मान राखला पाहिजे, मातृभाषा शिकलीच पाहिजे अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी दिवस आणि हिंदी संमेलनात आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच हिंदी, मराठी प्रमाणे इतर भाषांचाही परस्पर आदर राखण्याचा सर्वांनी संकल्प केला पाहिजे, असे आवाहनही यावेळी फडणवीस यांनी केले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी टीका केली आहे. माय मरो पण मावशी जगो..! बरोबर ना फडणवीस साहेब असं वक्तव्य अंबादास दानवे यांनी करत मुख्यमंत्र्यांना टोला लगावलाय. आता अंबादास दानवे यांच्या या टीकेवर भाजपचे नेते काय बोलणार? याकडं लक्ष लागलं आहे.

आम्हाला भारतातील प्रत्येक भाषा समृद्ध करायचीय

दरम्यान, या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील उपस्थित होते. आम्हाला भारतातील प्रत्येक भाषा समृद्ध करायची आहे असे मत अमित शाह यांनी व्यक्त केले. राजभाषेच्या समृद्धीसाठी आम्ही सिंधू शब्दकोश तयार केला आहे. मी याबद्दल नंतर अधिक सांगेन, पण वीर सावरकरांनी सर्व शब्दांचे पुनरावलोकन केले होते. ते म्हणाले की, आपल्या सर्वांना सावरकर आठवतात. ते एक महान स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक म्हणून ओळखले जातात, पण सावरकर हे त्यांच्या काळातील सर्वात विद्वान भाषाशास्त्रज्ञही होते. त्यांनी असे अनेक शब्द तयार केले जे आपल्या भारतीय भाषांमध्ये उपलब्ध नव्हते, आणि त्या सर्व शब्दांना राजभाषा असलेल्या मराठीत आणि देशातील इतर सर्व भाषांमध्ये सहज स्वीकृती मिळाली. त्यांनी टिळकांच्या 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या पत्राचा स्वीकार करून मराठी भाषेचे शुद्धीकरणही केले असे शाह म्हणाले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## समान नागरी कायद्यावरून (UCC) एनडीए आघाडीत मतभेद

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या समान नागरी कायद्याबाबतच्या (UCC) विधानावरून देशाच्या राजकारणात नवीन वादाला तोंड फुटले असून, याचा थेट परिणाम आता सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीवर (NDA) दिसून येत आहे. बिहारमधील एनडीए आघाडीमध्ये या संवेदनशील मुद्द्यावरून मित्रपक्षांमध्ये स्पष्ट मतभेद असल्याचे समोर आले आहे. एकीकडे भाजप या कायद्याच्या बाजूने आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत असताना, दुसरीकडे जेडीयूने हा कायदा बिहारमध्ये कोणत्याही परिस्थितीत लागू केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेतली आहे. जेडीयूचे नेते श्याम रजक यांनी यासंदर्भात पक्षाची मते अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली आहेत. जेडीयूच्या या भूमिकेनंतर भाजपचे आणखी एक प्रमुख मित्रपक्ष आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनीही आपली भूमिका जाहीर करत सावध पवित्रा घेतला आहे. चिराग पासवान यांनी स्पष्ट केले आहे की, त्यांचा पक्ष समानता आणि विविधता या दोन्ही गोष्टींचे जतन करण्यासाठी कटिबद्ध आहे. समान नागरी संहितेचा अंतिम मसुदा जेव्हा सार्वजनिक केला जाईल, त्यानंतरच त्यावर सविस्तर अभ्यास करून आपला पक्ष आपली अधिकृत भूमिका मांडेल, असे त्यांनी स्पष्ट केले. या मुद्द्यावर कोणतीही घाई करण्याऐवजी सर्व घटकांना विश्वासात घेणे आवश्यक असल्याचे त्यांच्या भूमिकेतून अधोरेखित होते. या संपूर्ण वादानरम्यान आपली अधिकृत भूमिका मांडताना चिराग पासवान यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एक महत्त्वाची पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, भारताची सामाजिक वीण अत्यंत वैविध्यपूर्ण असून देशातील प्रत्येक घटकाच्या स्वतःच्या नागरिक परंपरा आणि खास प्रथा आहेत, ज्यांना संविधानाने देखील मान्यता दिली आहे. संविधानातील पाचवी आणि सहावी अनुसूची, अनुच्छेद ३७१-ए आणि ३७१-जी, तसेच आतापर्यंत तयार करण्यात आलेल्या प्रत्येक कायद्यात अनुसूचित जमातींना देण्यात आलेली सवलत हे याच विविधतेचे जिवंत पुरावे आहेत, असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे या विषयाचा मसुदा तातडीने सार्वजनिकरीत्या प्रकाशित केला जावा, सर्व संबंधित घटकांच्या हिताचा सखोल विचार व्हावा आणि त्यावर व्यापक स्तरावर खुली चर्चा व सल्लामसलत केली जावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पाकिस्तानचे पुन्हा होणार तुकडे? नवीन प्रांत बनवण्याची चाल

पाकिस्तानचे नियोजन आणि विकास मंत्री अहसान इक्बाल, गृहमंत्री मोहसीन नक्वी आणि लष्कराच्या समर्थनानंतर पाकिस्तानात 12 ते 15 नवीन प्रांत तयार करण्याची चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे.

पाकिस्तानमध्ये 1971 च्या फाळणीनंतर 55 वर्षांनी पुन्हा एकदा फाळणीची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शाहबाज शरीफ यांच्या सरकारमधील मंत्र्यांनी आणि लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाकिस्तानचे पंजाब, सिंध, खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान हे चारही प्रांत मोडून त्यांचे 12 ते 15 लहान तुकडे करण्याचा प्रस्ताव समोर आणला आहे. पाकिस्तानात 1955 च्या 'वन युनिट' धोरणापासून सुरू झालेला प्रांतिक वादाचा इतिहास आता एका नव्या टप्प्यावर पोहोचला आहे.

**नवीन प्रांतांची मागणी आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी**

1955 मध्ये पश्चिम पाकिस्तानचे सर्व भाग एकत्र करून 'वन युनिट' बनवले गेले होते, जेणेकरून पूर्व पाकिस्तानच्या (बंगाली) लोकसंख्येला राजकीयदृष्ट्या दाबले जाऊ शकेल. 1970 मध्ये जनरल याह्या खान यांनी हे रद्द करून पुन्हा 4 प्रांत स्थापन केले. पंजाब प्रांतातील लाहौरच्या वर्चस्वाविरोधात सराइकी भाषिक जनता आणि जुन्या बहावलपूर संस्थानाचा भाग गेल्या अनेक दशकांपासून 'सराइकीस्तान' किंवा 'साउथ पंजाब' या वेगळ्या प्रांताची मागणी करत आहे.

2010 मध्ये 18 व्या घटनादुरुस्तीद्वारे एनडब्ल्यूएफपीचे (NWFP) नाव बदलून 'खैबर पख्तुनख्वा' केल्याने तिथल्या बिगर-पश्तून हजारा समुदायाने हिंसक आंदोलन उभारले होते. अर्बन सिंधमधील उर्दू भाषिक मुहाजिर समाज वेगळ्या प्रांताची मागणी करत आहे, ज्याला मूळ सिंधी भाषिक आणि बिलावल भुट्टोंचा पाकिस्तान पीपल्स पार्टी (PPP) कडाडून विरोध करत आहे.

**लष्कराची पडद्यामागची खरी चाल काय?**

राजकीय विश्लेषकांच्या मते, या प्रस्तावामागे लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पाकिस्तान लष्कराचे मोठे हितसंबंध आहेत. 2008 मधील 18 व्या घटनादुरुस्तीनुसार केंद्राकडून प्रांतांना मिळणारा महसूल वाढला होता. यामुळे लष्कराच्या संरक्षण बजेटसाठी केंद्राकडे निधी कमी पडतो. जर प्रांतांचे तुकडे झाले, तर प्रांतीय सरकारांची ताकद आणि केंद्राला आव्हान देण्याची क्षमता कमी होईल. परिणामी, पाकिस्तान लष्कराचे संपूर्ण देशावर पूर्ण नियंत्रण प्रस्थापित होईल.

**कायदेशीर आणि आर्थिक अडचणी**

पाकिस्तानच्या 1973 च्या संविधानानुसार नवीन प्रांत बनवण्यासाठी नॅशनल असेंब्ली, सिनेट आणि संबंधित प्रांतीय विधानसभेत दोन-तृतियांश बहुमताची गरज असते. आधीच आयएमएफ (IMF) च्या कर्जावर चालणाऱ्या पाकिस्तानला प्रत्येक नव्या प्रांतासाठी नवीन विधानसभा, उच्च न्यायालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि प्रशासकीय यंत्रणा उभारणे प्रचंड महाग पडेल. जर प्रांतांच्या विभाजनामुळे पाकिस्तानात लष्कराचे वर्चस्व आणखी वाढले, तर भारतासाठी सीमेवरील सुरक्षेची आव्हाने आणि अस्थिरता अधिक वाढू शकते.

# पत्नीसह आई वडिलांनीही नाकारलं! भाजपच्या उमेदवाराला मिळालं फक्त 1 मत, दारुन पराभव

अनेक निवडणुकांमध्ये वेगवेगळे विक्रम होत असतात. कोण सर्वात जास्त मतांनी निवडणूक येतो. तर कोणाचा सर्वात कमी मतांनी पराभव होतो. मात्र, राजस्थानमध्ये एक वेगळाच विक्रम घडला आहे. राजस्थानमधील डिडवाना जिल्ह्यातील नागरी निवडणुकांच्या निकालात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला केवळ एकच मत मिळाले आहे. उमेदवाराच्या पत्तीनसह आई वडीसांचे देखील मत या उमेदवाराला मिळालं नाही. कैलाश चंद्र असं या उमेदवाराचं नाव आहे.

**उमेदवाराच्या कुटुंबियांनीदेखील मतदान केलं नाही** : परबतसर नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 13 मध्ये भाजपच्या उमेदवाराला केवळ एक मत मिळाले आहे. भाजपचे उमेदवार कैलाश चंद्र यांना फक्त स्वतःचेच एक मत मिळाले आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी देखील त्यांना मतदान केले नाही. त्यामुळं कुटुंबियांनी देखील मतदान का केलं नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे. विजयाची खात्री असलेल्या भाजप उमेदवाराला निवडणूक निकालानंतर जबर धक्का बसला आहे. नगरपालिकेची निवडणूक लढवणाऱ्या, नगरसेवक होण्याची स्वप्नं पाहणाऱ्या भाजप उमेदवाराला केवळ 1 मत मिळाल्यानं खळबळ उडाली आहे. या उमेदवाराच्या कुटुंबियांनीदेखील त्याला मतदान केलं नाही. त्यामुळे या निकालाची चर्चा राज्यभरात आहे.

**काँग्रेसच्या उमेदवार हिना खानम विजयी** : प्रभाग क्रमांक 13 मधून काँग्रेसच्या उमेदवार हिना खानम विजयी झाल्या आहेत. त्यांना 376 मतं मिळाली आहेत. तर अपक्ष उमेदवार रसीद खां यांना 195 मतं मिळाली. प्रभाग क्रमांक 13 मध्ये एकूण 573 मतदान झालं. यातील केवळ 1 मत कैलाश चंद यांना मिळालं. त्यांना पत्नी आणि आई, वडिलांनीदेखील मत दिलं नाही. त्यामुळे कैलाश चंद यांचा दारुण पराभव झाला. विशेष म्हणजे राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाच्या उमेदवारालदेखील अशाच प्रकारचा धक्का बसला. प्रभाग क्रमांक 20 मधून लढलेले राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाचे उमेदवार भंवरलाल यांना केवळ 1 मत मिळालं.

**एका मत मिळालेल्या उमेदवाराची प्रतिक्रिया** : दरम्यान, परबतसर नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 13 मध्ये भाजपचे उमेदवार कैलाश चंद्र यांना केवळ एक मत मिळाल्यामुळं त्याचं दारुन पराभव झाला आहे. परभावानंतर त्यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे. या ठिकाणी एक मत मिळवणेही खूप अवघड होते अशी प्रतिक्रिया कैलाश चंद्र यांनी दिली आहे.

**कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या?** : प्रभाग क्रमांक 13 मध्ये भाजपला जबर झटका बसला. पण परबतसर नगरपालिकेत भाजपनं विजय मिळवला. 25 पैकी 13 प्रभागांमध्ये भाजपनं विजयाची नोंद केली. तर 12 प्रभागांमध्ये काँग्रेसनं विजय मिळवला. तर डीडवाना नगर परिषदेत काँग्रेसचा झेंडा फडकला आहे. इथल्या 40 पैकी 14 प्रभागांमध्ये अपक्ष उमेदवारांनी बाजी मारली. तर काँग्रेसनं 16 जागांवर विजयाची नोंद केली. भाजपला अवघ्या 9 जागांवर यश मिळालं. कुचामन नगर परिषदेतही अपक्षांचा बोलबाला पाहायला मिळाला. या नगर परिषदेत काँग्रेसनं 17 प्रभागांवर वर्चस्व राखलं. तर अपक्षांनी 13 प्रभागांमध्ये विजयाची नोंद केली. भाजपनं 15 प्रभागात विजय मिळवला.

# निळा झेंडा : हातातील प्रतीक नव्हे, मनातील परिवर्तनाचा विचार

## संघर्षातून स्वाभिमानाकडे, स्वाभिमानातून समतेकडे आणि समतेतून संविधानिक भारताकडे...

"निळा झेंडा आमचा श्वास आहे, आमचा अभिमान आहे; तो आमच्या संघर्षाची ओळख आहे आणि समतेच्या भविष्याची दिशा आहे."निळा झेंडा हातात घेतला की हातात केवळ कापडाचा एक तुकडा येत नाही; त्या झेंड्यासोबत इतिहासातील असंख्य वेदना, संघर्ष, अश्रू, स्वाभिमान आणि परिवर्तनाची अखंड कहाणी आपल्या हातात येते. ज्यांना कधी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला गेला, ज्यांच्या

सावलीलाही विटाळ मानला गेला, ज्यांच्यासाठी शिक्षणाची दारे बंद होती, ज्यांना सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित ठेवण्यात आले, त्या समाजाला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आत्मसन्मानाची भाषा शिकवली. प्रश्न विचारण्याची ताकद दिली. शिक्षणाचा मार्ग दाखविला. संघटित होण्याची प्रेरणा दिली आणि संविधानाच्या माध्यमातून न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा अधिकार दिला.म्हणून निळा झेंडा हा केवळ एका समाजाच्या भावनेचे प्रतीक म्हणून पाहणे त्याच्या व्यापक अर्थाला मर्यादित करणारे ठरेल. निळा रंग म्हणजे विशाल आकाशाची आठवण जिथे कोणासाठीही सीमा नाही. निळा झेंडा म्हणजे स्वाभिमानाची जाणीव. तो संघर्षाची स्मृती आहे, वर्तमानाची जाणीव आहे आणि भविष्यातील समतामूलक समाजाचे स्वप्न आहे.

निळ्या झेंड्याकडे पाहताना आपल्याला एक प्रश्न मात्र कायम विचारावा लागतो हा झेंडा आपण फक्त हातात घेतला आहे की त्यामागचा विचारही आपल्या जीवनात स्वीकारला आहे?याच प्रश्नाचे उत्तर शोधणे म्हणजे निळ्या झेंड्याची खरी यशोगाथा समजून घेणे होय.

भारतीय समाजाच्या इतिहासात विषमतेची अनेक काळी पाने आहेत. जन्मावर आधारित सामाजिक व्यवस्था माणसाचे स्थान निश्चित करीत होती. कोणाला शिक्षण मिळणार, कोणाला पाणी मिळणार, कोणाला मंदिरात प्रवेश मिळणार, कोणाला प्रतिष्ठा मिळणार याचेही निकष जन्मावर ठरविले जात होते.या व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणे म्हणजे केवळ सामाजिक विरोध नव्हता; ते प्रस्थापित व्यवस्थेला दिलेले थेट वैचारिक आव्हान होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा संघर्ष स्वीकारला. त्यांनी वंचित समाजाला केवळ सहानुभूती दिली नाही; तर स्वाभिमानाने जगण्याची दिशा दिली. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह असो, मंदिरप्रवेशाचा लढा असो, शिक्षणासाठीची धडपड असो किंवा सामाजिक समतेसाठीचा संघर्ष असो प्रत्येक आंदोलनामागे एकच मूलभूत विचार होता - माणूस जन्माने मोठा किंवा लहान नसतो; त्याला समान मानवी प्रतिष्ठेचा अधिकार आहे.

हीच जाणीव पुढे निळ्या झेंड्याच्या अस्मितेचा आधार बनली.निळा झेंडा म्हणूनच अनेकांसाठी स्वतःच्या अस्तित्वाची ओळख आहे. ज्यांना शतकानुशतके आपली ओळख लपवावी लागली, त्यांनी निळ्या झेंड्याखाली उभे राहताना पहिल्यांदा आपला स्वाभिमान उंचावलेला अनुभवला. ही अस्मिता कोणाविरुद्ध द्वेष निर्माण करणारी नसून स्वतःच्या माणूसपणाची जाणीव करून देणारी अस्मिता आहे.

अनुसूचित समाजाच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवासात निळ्या झेंड्याला भावनिक स्थान प्राप्त झाले आहे. कारण या झेंड्याकडे पाहिले की संघर्षाची आठवण होते; पण त्याच वेळी भविष्याची आशाही दिसते.निळा झेंडा सांगतो परिस्थिती कितीही कठीण असली तरी माणसाने आशा सोडू नये.

तो सांगतो अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे जाता येते.

तो सांगतो अन्यायासमोर मान खाली घालण्यापेक्षा संविधानिक मार्गाने हक्कांसाठी उभे राहता येते.

तो सांगतो शोषित माणूस कायम शोषित राहण्यासाठी जन्माला आलेला नाही. म्हणूनच निळा झेंडा अनेकांच्या जीवनातील जगण्याची उमेद बनतो.

बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना मजबूत आधार दिला. त्यामुळे निळ्या झेंड्याकडे पाहताना संविधानाची आठवण होणे स्वाभाविक आहे.आज एखादा विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतो, एखादी महिला आपल्या अधिकारांसाठी आवाज उठवू शकते, एखादा कामगार न्यायाची मागणी करू शकतो, एखादा वंचित नागरिक मतदानाचा अधिकार बजावू शकतो या सर्वांच्या मुळाशी संविधानिक लोकशाहीची शक्ती आहे.म्हणून निळा झेंडा हा स्वातंत्र्याची जाणीव करून देणारा झेंडा आहे.

स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्त होणे नव्हे. माणसाला भीतीपासून, अज्ञानापासून, भेदभावापासून, सामाजिक गुलामगिरीपासून आणि अन्यायापासून मुक्त होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ज्याच्या हातात संविधानिक अधिकारांची जाणीव आहे, ज्याच्या मनात शिक्षणाचा प्रकाश आहे आणि ज्याच्या विचारांत समतेची भूमिका आहे,त्याच्यासाठी निळा विचार हे एक प्रकारचे संरक्षणकवच ठरते.हे संरक्षणकवच कोणाविरुद्ध शारीरिक संघर्षाचे नाही; ते अज्ञान, अंधश्रद्धा,अन्याय, भेदभाव आणि मानसिक गुलामगिरीविरुद्धचे वैचारिक कवच आहे.आजच्या काळातही समाजासमोर अनेक आव्हाने आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून चुकीची माहिती वेगाने पसरते. जातीय द्वेषाचे संदेश समाजात तणाव निर्माण करतात. अफवा आणि पूर्वग्रह माणसाला माणसापासून दूर करतात.अशा वेळी बाबासाहेबांचा विवेकवादी आणि संविधानिक विचार तरुणाईसाठी दिशादर्शक ठरतो.वाचा, विचार करा, प्रश्न विचारा आणि सत्याचा शोध घ्या हीच निळ्या विचारांची खरी ताकद आहे.

आजचा तरुण निळा झेंडा हातात घेतो तेव्हा त्याने केवळ घोषणा देऊन थांबू नये. त्याने

बाबासाहेबांच्या विचारांचा अभ्यास केला पाहिजे. संविधान वाचले पाहिजे. इतिहास समजून घेतला पाहिजे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.

कारण आजची लढाई केवळ रस्त्यावरची नाही; ती ज्ञानाची, कौशल्याची आणि विचारांची लढाई आहे. स्पर्धेच्या युगात शिक्षण आणि कौशल्य हीच मोठी शक्ती आहे. गरीब कुटुंबातील मुलाने उच्च शिक्षण घेणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने मोठे स्वप्न पाहणे, मुलींनी आत्मनिर्भर होणे, तरुणांनी रोजगारनिर्मिती करणे आणि समाजातील दुर्बल घटकांना पुढे आणणे हीच आजच्या काळातील सामाजिक क्रांती आहे.निळा झेंडा तरुणांना सांगतो फक्त इतिहासाचा अभिमान बाळगू नका; भविष्य घडविण्याची जबाबदारीही

स्वीकारा.निळा झेंडा हातात घ्या, पण त्याच्याशी प्रामाणिक राहा.

निळा झेंडा फडकवा, पण त्याच्या विचारांना जगवा. निळ्या झेंड्याचा जयघोष करा, पण त्याच्या मूल्यांशी कधीही बेईमानी करू नका.कारण निळा झेंडा आपला अभिमान आहे;आणि त्या अभिमानाशी प्रामाणिक राहणे हीच आपली खरी ओळख आहे.

निळा झेंडा हातात घेणे सोपे आहे; पण त्याचा विचार मनात रुजविणे कठीण आहे. बाबासाहेबांचे नाव घेणे सोपे आहे; पण त्यांच्या विचारांनुसार वागणे कठीण आहे.

समतेची घोषणा करणे सोपे आहे; पण आपल्या घरापासून समतेची सुरुवात करणे ही खरी कसोटी आहे. म्हणून निळ्या झेंड्याची खरी ताकद मिरवणुकीत नाही, तर माणसाच्या आचरणात आहे.

निळ्या झेंड्याचा जयघोष करताना समाजातील दुर्बल घटकांचा विसर पडता कामा नये. शिक्षणासाठी मदत करणे, गरजू विद्यार्थ्याला पुस्तक देणे, रक्तदान करणे, एखाद्या आजारी व्यक्तीला उपचारासाठी मदत करणे, वृद्धांना आधार देणे, महिलांना सन्मानाने जगण्यासाठी संधी निर्माण करणे, अंधश्रद्धेविरुद्ध जनजागृती करणे आणि संविधानिक मूल्यांसाठी लोकांना जागृत करणे ही सर्व निळ्या विचाराचीच सामाजिक रूपे आहेत.कारण समाज बदलतो तो केवळ घोषणांनी नाही; तर छोट्या-छोट्या कृतींनी.एका मुलाच्या हातात पुस्तक दिले, तर एक भविष्य घडते.एका गरजू व्यक्तीला आधार दिला, तर एक आयुष्य सावरते.एका

अन्यायाविरुद्ध आवाज उठविला, तर अनेकांना धैर्य मिळते.आणि एका माणसाला माणूस म्हणून सन्मान दिला, तर मानवतेचा विजय होतो.

आपण निळ्या झेंड्याची यशोगाथा सांगतो; पण ही यशोगाथा अजून पूर्ण झालेली नाही.कारण समाजात अजूनही विषमता आहे. अजूनही काही मुले शिक्षणापासून वंचित आहेत. अजूनही आर्थिक परिस्थितीमुळे अनेकांची स्वप्ने अपूर्ण राहतात. अजूनही जातीय पूर्वग्रह समाजाच्या काही स्तरांमध्ये टिकून आहेत. अजूनही महिलांना समानतेसाठी संघर्ष करावा लागतो.म्हणून निळा झेंडा आपल्याला विजयाचा गर्व करण्यापेक्षा अपूर्ण कामाची जाणीव करून देतो.ज्या दिवशी समाजातील शेवटच्या माणसाला न्याय मिळेल, ज्या दिवशी कोणालाही जन्माच्या आधारावर कमी लेखले जाणार नाही, ज्या दिवशी प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळेल, ज्या दिवशी प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन मिळेल आणि ज्या दिवशी माणूस माणसाला केवळ माणूस म्हणून स्वीकारेल त्या दिवशी निळ्या झेंड्याची यशोगाथा खऱ्या अर्थाने पूर्ण होईल.

आज आपण निळ्या झेंड्याला सलाम करतो. त्याच्या निळाईत आपल्या पूर्वजांच्या संघर्षाचे प्रतिबिंब पाहतो. बाबासाहेबांच्या त्यागाची आठवण करतो. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा अभिमान बाळगतो.पण या अभिमानासोबत एक जबाबदारीही स्वीकारली पाहिजे.कारण निळा झेंडा आकाशात फडकणे ही केवळ सुरुवात आहे; तो माणसाच्या मनात फडकणे ही खरी क्रांती आहे.एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या डोळ्यात शिक्षणाचे स्वप्न निर्माण झाले, तर तिथे निळा झेंडा फडकतो. एखाद्या अन्यायग्रस्ताच्या बाजूने समाज उभा राहिला, तर तिथे निळा झेंडा फडकतो. एखाद्या स्त्रीला सन्मानाने जगण्याची संधी मिळाली, तर तिथे निळा झेंडा फडकतो. एखाद्या वंचित माणसाला "तू एकटा नाहीस" असा आधार मिळाला, तर तिथे निळा झेंडा फडकतो.आणि जेव्हा जात, धर्म, भाषा, प्रदेश यापलीकडे जाऊन माणूस

माणसाच्या दुःखाला आपले दुःख मानतो तेव्हा निळ्या झेंड्याचा विचार खऱ्या अर्थाने जिवंत होतो.

म्हणून पुढच्या पिढीच्या हातात निळ्या झेंड्या सोबतच पुस्तक द्यावे, संविधान द्यावे, विवेक द्यावा, स्वाभिमान द्यावा आणि समतेची दृष्टी द्यावी. कारण झेंडा फाटू शकतो, रंग फिका पडू शकतो, मिरवणूक संपून जाऊ शकते; पण विचार जिवंत राहिला तर संघर्ष जिवंत राहतो आणि संघर्ष जिवंत राहिला तर परिवर्तनाची वाट कधीच बंद होत नाही. म्हणूनच निळा झेंडा केवळ भूतकाळाची आठवण नाही तो उद्याच्या भारताचे स्वप्न आहे.तो केवळ आपल्या हातात नसावा...तो आपल्या विचारांत असावा.तो आपल्या शब्दांत असावा.तो आपल्या आचरणात असावा. तो आपल्या सामाजिक कार्यात असावा.आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो प्रत्येक माणसाच्या स्वाभिमानात फडकला पाहिजे.

ज्या दिवशी भारतातील शेवटच्या माणसाच्या डोळ्यात अश्रूऐवजी आत्मविश्वास असेल, हातात भीक नव्हे तर संधी असेल, मनात भीती नव्हे तर स्वाभिमान असेल आणि समाजात भेदभाव नव्हे तर बंधुता असेल त्या दिवशी आकाशात फडकणारा निळा झेंडा केवळ एक प्रतीक राहणार नाही; तो एका समतामूलक भारताच्या स्वप्नाचा विजयध्वज ठरेल.

निळा झेंडा हातात घेणे म्हणजे परिवर्तन झाले असे नाही. परिवर्तन तेव्हा घडते, जेव्हा झेंड्याचा विचार आपल्या वागण्यात उतरतो.

आपल्या जवळच्या माणसावर अन्याय होत असताना गप्प बसतो. आपण समतेच्या घोषणा देतो, पण स्वतःच्या वागण्यात भेदभाव ठेवतो. आपण स्वाभिमानाच्या गोष्टी करतो, पण एखाद्या पदासाठी, प्रसिद्धीसाठी किंवा स्वार्थासाठी आपल्या विचारांशी तडजोड करतो. अशा वेळी प्रश्न झेंड्याचा नसतो; प्रश्न आपल्या प्रामाणिकपणाचा असतो. निळ्या झेंड्याला सर्वाधिक धोका विरोधकांकडून नसतो; तर आपल्याच समाजातील काही बेईमान झालेल्या निळा गमच्या गळ्यात घालून आणि निळा झेंडा हातात घेऊन त्याच्या विचारांशी बेईमानी करणाऱ्यांकडून असतो. जे आज निळ्या झेंड्याविषयी गरळ ओकत आहेत त्यांना निळ्या झेंड्याने मोठे केलेले आहे हे ते विसरत आहेत.

निळा झेंडा हातात घेणाऱ्या प्रत्येकाने स्वतःच्या मनाशी प्रामाणिक राहिले पाहिजे.

कारण झेंड्याला फसवता येत नाही. समाजाला काही काळ फसवता येईल, लोकांना काही काळ भ्रमित करता येईल; पण आपल्या अंतर्मनाला आपण कायम फसवू शकत नाही. इतिहासही प्रत्येकाच्या कृतीची नोंद ठेवतो. उद्या पुढची पिढी तुम्हाला प्रश्न विचारेल "तुमच्या हातात निळा झेंडा होता,तर मग आज दुसरा झेंडा घेण्याची गरज काय होती"? तुमच्या स्वार्थापोटी तुम्ही निळा झेंडा दूर करून दुसरा झेंडा खांद्यावर घेत समाजाला किती दिवस फसवणार आहात. तुमचा झेंडा तुम्हालाच लखलाभ असू द्या! पण आमचा निळा झेंडा आमचा श्वास आहे... निळा झेंडा आमचा अभिमान आहे...निळा झेंडा आमची प्रेरणा आहे...निळा झेंडा आमचे संरक्षणकवच आहे... आणि निळ्या विचारांना कृतीत उतरवणे हीच आमची खरी जबाबदारी आहे.जय भीम! जय संविधान!

**लेखक**
**समाजभूषण रामदास वच्छलामाई रखमाजी वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**

# परभणी महापालिका मुख्यालयात गणरायाचे उत्साहात आगमन



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** महानगरपालिका कर्मचारी व अधिकारी गणेश महामंडळाच्या वतीने महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये श्री गणेशाची उत्साहात स्थापना करण्यात आली. यावेळी उपायुक्त तुकाराम कदम यांच्या हस्ते श्री गणेशाची महापूजा करण्यात आली.

ढोल-ताशांच्या गजरात गणरायाचे महापालिका कार्यालयात आगमन झाल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी उपायुक्त तुकाराम कदम यांचा सत्कार संघटनेचे लक्ष्मण जोगदंड यांनी केला. यावेळी नगरसचिव विकास रत्नपारखी, मुख्य स्वच्छता अधिकारी करण गायकवाड, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुरा, बाळासाहेब कुलकर्णी, मनोज तळेकर, राजेभाऊ मोरे, मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष विनय ठाकूर, उपाध्यक्ष लक्ष्मण जोगदंड, सरचिटणीस मनोज गहलोत, कोषाध्यक्ष कुणाल भारसाकळे, सहसचिव मनोज तळेकर, पंकज देशमुख,संगीता उबाळे, आरती प्रमुख दिलीप बनसोडे, भागवत कडनूर, ज्योती मोरे, सदस्य प्रकाश गायकवाड, किरण गायकवाड, शेख इस्माईल, जोगिंदर काकडा, ज्ञानोबा मस्के, राहुल तालेवार, गोपाल मोहटे, विनोद गहलोत, विठ्ठल शेळके, मुजमुले, अंबादास शिंदे, दिलीप बनसोडे, विशाल उपाडे, सुमित दरक, करे, कन्नूर आदी पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गणेशोत्सवानिमित्त महापालिका कार्यालयात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, कर्मचारी व अधिकारी मोठ्या उत्साहाने गणरायाच्या सेवेत सहभागी झाले आहेत.

# शेतकऱ्यांना आत्महत्या करू नका विविध महा जनजागृती अभियान आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-गौरक्षक सेना प्रणित कै.छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित राष्ट्र जन फाउंडेशन गणेश महोत्सव 2026 च्या वतीने गणपती महोत्सव च्या निमित्ताने महा विविध जनजागृती अभियान राबवण्यात येणार यामध्ये 1)पाणी बचाव जल है तो कल है अभियान 2) गोमाता नंदीबैल गोसंवर्धन अभियान 3) शेतकऱ्यांनो आत्महत्या करू नका जनजागृती अभियान 4) डीजे मुक्त जनजागृती अभियान 5) गणेशोत्सवात टाळ मृदंग भजनात मिरवणूक काढावी जनजागृती अभियान 6) सर्व समाज एकता संवाद जनजागृती अभियान 7) झाडे लावा झाडे जगवा पर्यावरण निसर्ग जनजागृती अभियान 8) शरीर आरोग्यासाठी आयुर्वेदिक जनजागृती अभियान 9) स्वच्छता अभियान 10) अन्नदान श्रेष्ठदान जनजागृती आधी विविध महा जनजागृती अभियान मागील अकरा वर्षापासून राबवण्यात येत आहे तर याही वर्षी गौरक्षक सेना प्रदेश मंत्री गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर यांच्या पुढाकारातून विविध गणेश मंडळांना मध्ये जनजागृती करण्यात येते गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्थी या बारा दिवसांमध्ये गणेशोत्सवात विविध महाजन जागृती अभियान राबविण्यात येणार यावेळी कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी अध्यक्ष गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर, श्री श्री 1008 महामंडलेश्वर सचितानंद सरस्वती स्वामी अशोक महाराज पवार, अन्नदान सम्राट ह भ प गोविंद महाराज पौढे गुरुजी, आयुर्वेदिक डॉ. गोविंद कामटे ,वृक्षसंगोपन शिवलिंग आप्पा खापरे, , स्वच्छता दूत कमळाजी कावळे मामा , सामाजिककार्यकर्ते शेख सरफराज भाई, बालकलाकार रितेश आवटे यांच्यासह आधी जण जनजागृती करणार आहे गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया अशी माहिती राष्ट्रजन फाउंडेशन गणेश महोत्सव विविध महा जनजागृती अभियान प्रमुख गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार माहिती दिली

## क्रोमावर आयफोन 18 प्रो प्री-बुकिंग सुरु

छत्रपती संभाजीनगर : टाटा ग्रुपचा एक सदस्य आणि भारतातील आघाडीचा इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर ब्रँड असलेल्या क्रोमाने, नवीन आयफोन १८ प्रो आणि आयफोन १८ प्रो मॅक्ससाठी प्री-बुकिंग सुरू झाल्याची घोषणा केली आहे. ग्राहक आता देशभरातील कोणत्याही क्रोमा स्टोअरमध्ये,, टाटा नेउ ॲप आणि बिग बास्केटवर सुविधाजनक ऑफर्ससह ही सर्वात नवीन ॲपल डिव्हायसेस आता बुक करू शकतात.नवीन प्रो लाइन-अपमध्ये परफॉर्मन्स आणि फोटोग्राफीमधील ॲपलचे सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे.

## चतुर्थीच्या मुहूर्तावर चिंतामणीचे दर्शन

छत्रपती संभाजीनगर - अदाणी एंटरप्रायझेसचे संचालक श्री. प्रणव अदाणी आणि अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) चे व्यवस्थापकीय संचालक श्री.करण अदाणी यांनी आपल्या कुटुंबीयांसह गणेश चतुर्थीच्या निमित्ताने चिंचपोकळीचा चिंतामणी येथे गणरायाचे दर्शन घेतले व प्रार्थना केली.अदाणी एंटरप्रायझेसचे व्यवस्थापकीय संचालक (ॲग्रो, ऑइल अँड गॅस) आणि संचालक प्रणव अदाणी म्हणाले, "चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळासोबत भागीदारी करण्याचा आम्हाला खरोखरच सन्मान वाटतो. 107व्या वर्षात पदार्पण केलेल्या चिंचपोकळीचा चिंतामणीचा समृद्ध वारसा हा भक्ती, एकता आणि मुंबईच्या सांस्कृतिक हृदयाचे प्रतीक राहिला आहे."

## इलेक्ट्रॉनिका इंडिया 2026 बेंगळुरूमध्ये

मुंबई - भूपिंदर सिंह, प्रेसिडेंट – आईएमईए (भारत, मध्य पूर्व, अफ्रीका), मेस्से मुएनचेन आणि सीईओ , मेस्से मुएनचेन इंडिया म्हणाले, "भारताचा इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. मॅन्युफॅक्चरिंगचा विस्तार, धोरणात्मक पाठबळ आणि ग्लोबल व्हॅल्यू चेनमधील वाढती भागीदारी या क्षेत्राच्या वाढीला पुढे नेत आहेत. इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 चा मोठा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय सहभाग हीच गती दर्शवतो. बेंगळुरूमध्ये आमचे लक्ष उद्योगाच्या महत्त्वाकांक्षा योग्य तंत्रज्ञान, पुरवठादार आणि भागीदारींसोबत जोडण्यावर आहे, ज्यामुळे मजबूत उत्पादन क्षमता विकसित होईल आणि चांगले व्यावसायिक परिणाम साधता येतील."

## वामिका गब्बी ची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती

मुंबई - भारतातील आघाडीच्या प्रीमियम बाथ फिटिंग्ज आणि सॅनिटरीवेअर ब्रँडपैकी एक असलेल्या जल बाथ फिटिंग्जने आपली नवीन डिजिटल ब्रँड फिल्म प्रदर्शित केली आहे आणि प्रसिद्ध अभिनेत्री वामिका गब्बी ची अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. ही भागीदारी ब्रँडची राष्ट्रीय उपस्थिती मजबूत करण्याच्या आणि डिझाइनची जाण असलेल्या भारतीय ग्राहकांच्या नवीन पिढीशी जोडले जाण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## 'खुली बात'ची सुरुवात

मुंबई: बालसुरक्षेची सुरुवात संवादातून होते. एनसीआरबीच्या 'क्राइम इन इंडिया 2024' या अहवालानुसार, भारतात लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्यांतर्गत 69,191 प्रकरणांची नोंद झाली. यांपैकी 96%हून अधिक प्रकरणांमध्ये अनोळखी व्यक्तींऐवजी मुलांच्या जवळच्या परिचयातील व्यक्ती जबाबदार होत्या.

# श्री गणेश महासंघाच्या गणरायाची खा. संदीपान भुमरे यांच्या हस्ते प्रतिष्ठापना

## आ. अंबादास दानवे यांच्या हस्ते आरती; मंगळवारी महापुरुष स्मारक स्वच्छता अभियान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** निराला बाजार येथील श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयात सोमवारी (दि. १४) गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

बंडू गुरुजी यांनी विधिवत पूजा करून गणरायाची प्रतिष्ठापना केली. यानंतर पोलीस आयुक्त प्रविण पवार, संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे, कार्याध्यक्ष राजेंद्र दानवे, मनसे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत जोशी यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी उत्सव समितीचे माजी अध्यक्ष अभिषेक देशमुख, अनिकेत निल्लावार, कार्याध्यक्ष विशाल दाभाडे, संदिप शेळके, हरीश शिंदे, दिनेश राजेभोसले, प्रमोद ठेंगडे, नंदू लबडे, निनाद खोचे, मोहित त्रिवेदी, शिवाजी जोगदंड, समाधान पाटील, प्रल्हाद घुगे, बंटी चौधरी, सागर निकम, चंदू हिवाळे, ऋषिकेश हिवाळे, अभिषेक हिवाळे, विशाल जाधव, प्रसिद्धीप्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे आदी उपस्थित होते.

श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विविध समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत मंगळवारी (दि. १५) सकाळी ८ वाजता शहरातील विविध महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता करण्यात येणार आहे. क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या अभियानाचा प्रारंभ करण्यात येणार आहे.

यानंतर क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज, पैठण गेट येथील लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यसेनानी गोविंदभाई श्रॉफ, सावरकर चौक येथील स्वातंत्र्यवीर सावरकर, संभाजीपेठ येथील क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले तसेच मिल कॉर्नर येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मारकांची साफसफाई करून अभिवादन करण्यात येणार आहे.

या उपक्रमात गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार व उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे यांनी केले आहे.

# आरोग्य यंत्रणेत खळबळ! 10 बड्या रुग्णालयांना महापालिकेची नोटीस

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - शहरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या नियमांचे गंभीर उल्लंघन होत असल्याचे उघडकीस आले आहे. एशियन हॉस्पिटलच्या एनआयसीयूला लागलेल्या आगीच्या दुर्दैवी घटनेनंतर महापालिकेने कठोर पावले उचलत शहरातील २०० ते ३०० किंवा त्याहून अधिक खाटा असलेल्या मोठ्या रुग्णालयांच्या तपासणीची विशेष मोहीम हाती घेतली. या पाहणीदरम्यान १० नामांकित रुग्णालयांमध्ये अग्निशमन व सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर त्रुटी आढळल्या असून, महापालिकेने या सर्व रुग्णालयांना तात्काळ नोटीस बजावली आहे.

महापालिकेच्या पथकाने केलेल्या पाहणीत अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. तपासणीदरम्यान अनेक रुग्णालयांच्या अतिदक्षता विभागात आगीच्या किंवा आपत्कालीन प्रसंगी बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र आपत्कालीन दरवाजा नसल्याचे निदर्शनास आले. काही रुग्णालयांमध्ये कागदोपत्री अग्निशमन यंत्रणा बसवलेली असली, तरी प्रत्यक्ष आपत्कालीन प्रसंगी ती कार्यान्वित स्थितीत नसल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय बहुमजली इमारतींमध्ये रुग्णांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेल्या रॅम्पचा अभाव असल्याचे आणि रुग्णालयातील सुरक्षा व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना आपत्कालीन यंत्रणा हाताळण्याची किंवा आगीच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीची पुरेशी माहिती नसल्याचेही समोर आले. सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि गंभीर त्रुटी असणाऱ्या १० प्रमुख रुग्णालयांना महापालिकेने नोटीस बजावली आहे. शहरातील रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या हजारो रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या या त्रुटी महापालिकेने अत्यंत गांभीर्याने घेतल्या आहेत. बजावलेल्या नोटीसीनुसार या सर्व रुग्णालयांना लवकरात लवकर सुरक्षाविषयक त्रुटी दूर करून अग्निशमन दलाचे नियम पूर्ण करावे लागणार आहेत. अन्यथा, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या रुग्णालयांवर प्रशासनाकडून कायदेशीर व कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

# अध्यापन, प्रशिक्षण व संशोधनाला मिळणार चालना; डॉ. शिवाजी सुक्रे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील अस्थिरोग विभागासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अद्ययावत परिसंवाद सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. या नूतन सभागृहाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

अस्थिरोग विभागातील पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन या सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, अस्थिरोग विभागाचे विभागप्रमुख डॉ. एम. बी. लिंगायत यांच्या समन्वयातून तसेच विभागातील सर्व युनिटप्रमुख व प्राध्यापकांच्या सहकार्याने ही सुविधा साकारण्यात आली.

या सभागृहाचा उपयोग शैक्षणिक व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, रुग्णप्रकरणांचे सादरीकरण, चिकित्सक चर्चा, जर्नल क्लब, शैक्षणिक सादरीकरणे, विषयतज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा आणि सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (सीएमई) कार्यक्रमांसाठी करण्यात येणार आहे. आधुनिक उपचारपद्धती, अद्ययावत शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, रुग्णनिदान, संशोधन तसेच अस्थिरोगशास्त्रातील नवीन घडामोडींवर या माध्यमातून ज्ञानविनिमयाला चालना मिळणार आहे. नूतन सुविधेमुळे अस्थिरोग विभागातील अध्यापन, प्रशिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येणार असून, विद्यार्थ्यांच्या तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेतही वाढ होण्यास मदत होणार आहे. उद्घाटनप्रसंगी अस्थिरोग विभागाचे विभागप्रमुख डॉ. एम. बी. लिंगायत, प्राध्यापक डॉ. निलेश कचनेरकर, डॉ. अन्सारी अझीझ, डॉ. सरोजनी जाधव, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. भारत सोनवणे, डॉ. सुचेता जोशी, डॉ. अदिती लिंगायत, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी आणि निवासी डॉक्टर उपस्थित होते.

# लोकअदालतीत तडजोडीचा 'गडदे पॅटर्न'; 145 प्रकरणांना न्याय!

## ज्योती महाजन यांच्या प्रकरणात 30 लाखांची तडजोड; नव्याने दाखल झालेली प्रकरणेही निकाली




हिंगोली - न्यायालयीन वाद वर्षानुवर्षे सुरू राहण्याऐवजी सामोपचाराने आणि तडजोडीच्या माध्यमातून जलद निकाली काढण्याच्या लोकअदालतीच्या उद्देशाला हिंगोलीत मोठे यश मिळाले. शनिवारी (दि.१२) झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत अनुभवी विधिज्ञ ॲड. सुरेश गडदे यांच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे तब्बल १४५ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये ९७ प्रकरणे लोकअदालतीत, तर ४५ प्रकरणे मध्यस्थी प्रक्रियेतून निकाली काढण्यात आली.

३० लाखांची तडजोड ठरली.

सन २०२४ मध्ये दाखल झालेल्या ज्योती महाजन यांच्या प्रकरणात ॲड. सुरेश गडदे यांच्या प्रयत्नातून ३० लाख रुपयांची तडजोड झाली. या तडजोडीमुळे संबंधित कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला.

या प्रकरणातील ज्योती महाजन यांचे सासरे पक्षकार म्हणून उपस्थित होते. पक्षाघातामुळे त्यांना चालता येत नसल्याने ते न्यायालयाबाहेर वाहनात थांबले होते. ही बाब लक्षात येताच प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. एल. आणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाणी न्यायाधीश मानखर यांनी स्वतः वाहनाजवळ जाऊन त्यांची भेट घेतली. न्यायालयीन कामकाजासोबतच पक्षकारांच्या अडचणींची संवेदनशीलतेने दखल घेणाऱ्या या कृतीचे उपस्थितांनी कौतुक केले.

सन २०२६ मध्येच दाखल झालेली अनेक प्रकरणेही याच लोकअदालतीत तडजोडीने निकाली काढण्यात आली.

# जळकी बाजार येथे कल्याण मटका जुगार खेळताना एकास पकडले

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील जळकी बाजार येथे बेकायदेशीररित्या कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असताना हमीद शामद तडवी (३७, रा. जळकी बाजार, ता. सिल्लोड) याच्याविरुद्ध अजिंठा पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई १० सप्टेंबर रोजी दुपारी १२.४० वाजता करण्यात आली. या कारवाईत रोख रकमेसह जुगाराचे साहित्य असा एकूण १ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस हवालदार संदीप कोथळकर यांच्या तक्रारीवरून हमीद तडवी याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तडवी हा विनापरवाना पत्त्यावर पैसे लावून स्वतःच्या फायद्यासाठी कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

अजिंठा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पवन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भागवत शेळके तपास करीत आहेत. आरोपीला अटक न करता नोटीस देऊन सोडण्यात आले.

# गावातील महिलांनी भक्तिभावाने केले हरतालिका पूजन




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.१४ सप्टेंबर - तालुक्यातील गलवाडा (अ) येथे सोमवारी महिलांनी भक्तिभावाने हरतालिका पूजन केले. यावेळी शारदा इंगळे यांनी हरतालिकेची पोथी वाचून व्रताचे धार्मिक महत्त्व उपस्थित महिलांना सांगितले. हरतालिका हे हिंदू धर्मातील महिला व कुमारिकांसाठी महत्त्वाचे धार्मिक व्रत मानले जाते. विवाहित महिला पतीच्या दीर्घायुष्यासह अखंड सौभाग्यासाठी, तर कुमारिका मनासारखा जीवनसाथी मिळावा यासाठी हे व्रत करतात. पौराणिक मान्यतेनुसार, माता पार्वतीने भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती. त्याच्या स्मरणार्थ हे व्रत केले जाते. पूजनासाठी शारदा इंगळे, सरूबाई इंगळे, मंगलाबाई इंगळे, सरला इंगळे, शारदाबाई लवटे, मालुबाई लवटे, लताबाई इंगळे, रीना इंगळे, अनुसयाबाई लवटे, माधुरी लवटे यांच्यासह गावातील महिला उपस्थित होत्या.

# जुन्या जी.प.इमारतीत आरोग्य कर्मचाऱ्यांचा संशयास्पद मृत्यू

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-** जिल्हा परिषदेचा कर्मचारी सध्या जाम येथे कार्यरत असलेला आरोग्य कर्मचारी यांचा मृतदेह जुन्या जिल्हा परिषद इमारतीमधील गंभीर अवस्थेत अडकलेला आढळून आला.

सदरील घटना दिनांक १३ सप्टेंबर रविवार रोजी झाली पोलीस आणि घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढून जिल्हा सामान्य रुग्णालय दाखल करण्यात आला मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले या प्रकरणांमध्ये कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मत मूर्तीची नोंद करण्यात आली असून मयताचे नाव सय्यद खाजा जाहिरोद्दीन खाजा नसरुद्दीन वय 48 वर्षे राहणार कादरबाद परभणी असे आहे दिनांक 13 सप्टेंबर रविवार रोजी जुन्या जिल्हा परिषद इमारती परिसरात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाल्यानंतर घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता एक व्यक्ती जिल्हा परिषद सभागृहाच्या किमती गंभीर अवस्थेत अडकलेली अवस्थेत आढळून आला त्यांना कोतवाली पोलिसांनी बाहेर काढून जिल्हा सामान्य रुग्णालय मध्ये घेऊन गेले असणारे ड्युटीवर असणारे डॉक्टरने तपासून मयत सय्यद खाजा झहीरोदिन हे जांब येथील आरोग्य कर्मचारी म्हणून कार्यरत होते अशी माहिती पोलीस द्वारे देण्यात आली मयताचा मुलगा खाजा मोईनुद्दीन कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार करत असून दरम्यान सय्यद खाजा झहीरोदिन हे जुन्या जिल्हा परिषद इमारतीच्या परिसरात नेमके कोणत्या कारणासाठी गेले होते याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे व तें हा घातपात आहे की अपघात आहे याबाबत संशय व्यक्त केला जात असून मृत्यूचे नेमके कारण अस्पष्ट आहे या मृत्यूचा तपास लावून पुढील कारवाई करण्यात येणार असून पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

## रिअलएक्स आणि एमएसटी ब्लॉकचेन ने 'द बॉक्स'

मुंबई, 11 सप्टेंबर 2026: रिअलएक्स आणि एमएसटी ब्लॉकचेन यांनी लिमिनल च्या भागीदारीत आज 'द बॉक्स' हे स्वदेशी इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक लॉन्च केले. भारतात रिअल-वर्ल्ड ॲसेट्स )चे नियमन व अनुपालनाच्या चौकटीत टोकनायझेशन सक्षम करणे हा यामागील उद्देश आहे.वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई हे या उपक्रमाचे इकोसिस्टम पार्टनर आहे. या लॉन्चद्वारे रिअलएक्सचे रेडबॉक्स आणि व्हाईटबॉक्स सादर करण्यात आले असून, हे दोन्ही प्लॅटफॉर्म एमएसटी ब्लॉकचेन च्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. भारतीय पायाभूत व्यवस्थेवर टोकनाइज्ड ॲसेट प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी आवश्यक कायदेशीर, मार्केटप्लेस आणि ब्लॉकचेन इन्फ्रास्ट्रक्चर एकत्र आणण्याचे काम ते करतात.

# उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साई भक्ताकडून साई मंदिरासाठी 1.33 कोटींचा नंदी देणगी रूपात अर्पण

**शिर्डी (प्रतिनिधी) :** उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साईभक्तांकडून ५४ किलो ०६५ ग्रॅम चांदीचा नंदी व बेस ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम सोन्याचे शिंग व बिंदी साई चरणी देणगी स्वरूपात अर्पण करण्यात आली असून या नंदीची किंमत जवळपास १ कोटी ३३ लाख आहे

श्री गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साईभक्तांकडून साईबाबांच्या चरणी ५४ किलो ०६५ ग्रॅम वजनाचा चांदीचा नंदी व बेस तसेच ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम वजनाचे २२ कॅरेट सोन्याचे शिंग व बिंदी अशी देणगी प्राप्त झाल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

श्री साईबाबा समाधी मंदिरातील श्रींच्या मूर्तीसमोरील जुन्या नंदीचे विधिवत उत्तरपूजन करून, श्री गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर नव्याने अर्पण करण्यात आलेल्या नंदीची धार्मिक विधीपूर्वक प्रतिष्ठापना अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

आग्रा येथील साईभक्तांनी अर्पण केलेल्या चांदीच्या नंदीचे वजन २७ किलो ०२७ ग्रॅम असून, त्याचे देणगीमूल्य ६० लाख २७ हजार ०२१ इतके आहे. तसेच नंदीसाठी अर्पण करण्यात आलेल्या चांदीच्या बेसचे वजन २७ किलो ०३८ ग्रॅम असून, त्याचे देणगीमूल्य रु. ६० लाख २९ हजार ४७४ आहे. चांदीचा नंदी व बेस यांचे एकूण वजन ५४ किलो ०६५ ग्रॅम असून, एकूण देणगीमूल्य १ कोटी २० लाख ५६ हजार ४९५ इतके आहे.

या चांदीच्या नंदीला विशेष धार्मिक व अलंकारिक स्वरूप देण्यासाठी २२ कॅरेट सोन्याचे शिंग कव्हर व सोन्याची बिंदी देखील अर्पण करण्यात आली आहे. सोन्याच्या शिंगाचे वजन ६९ ग्रॅम ३०० मिलीग्रॅम, तर सोन्याच्या बिंदीचे वजन २९ ग्रॅम ३०० मिलीग्रॅम असून, दोन्ही अलंकारांचे एकूण वजन ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम आहे. या सोन्याच्या अलंकारांचे एकूण देणगीमूल्य १३ लाख ८५ हजार १३२ इतके आहे.



या साईभक्तांनी यापूर्वीही साईबाबांच्या चरणी विविध स्वरूपातील सोन्या-चांदीच्या वस्तू श्रद्धापूर्वक अर्पण केल्या आहेत. साईबाबांवरील अढळ श्रद्धेतून सातत्याने करण्यात येणारे त्यांचे हे योगदान साईभक्तीची समृद्ध परंपरा अधोरेखित करणारे आहे.

साईभक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या या अमूल्य दानातून साईबाबांच्या 'श्रद्धा आणि सबुरी' च्या संदेशाची अनुभूती अधिक दृढ होत असून, भक्ती, समर्पण आणि सेवाभावाची ही परंपरा अखंड सुरू आहे. साईभक्तांच्या विनंतीवरून त्यांचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# जैस्वाल निवासस्थानी गणरायाचे उत्साहात आगमन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** शिवसेना आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या निराला बाजार येथील निवासस्थानी गणपती बाप्पाचे उत्साहात आगमन झाले. यावेळी संपूर्ण जैस्वाल कुटुंबीयांनी श्रींची विधिवत प्राणप्रतिष्ठा करून मनोभावे दर्शन घेत गणरायाचे स्वागत केले. गणपती बाप्पाच्या आगमनानिमित्त जैस्वाल यांच्या निवासस्थानी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. आमदार प्रदीप जैस्वाल, युवासेना मराठवाडा निरीक्षक तथा नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल, निखिलेश जैस्वाल, दीपाली जैस्वाल, काजल जैस्वाल यांच्यासह जैस्वाल परिवारातील सदस्य यावेळी उपस्थित होते. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाचे स्वागत करण्यात आले.

## महाराष्ट्रात 570 कोटी रुपयांपेक्षा जास्त दाव्यांची परतफेड

**मुंबई :** स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एनएसई-स्टारहेल्थ; बीएसई - ५४३४१२) या भारतातील अग्रगण्य स्टँडअलोन आरोग्य विमा कंपनीने आर्थिक वर्ष २७ च्या पहिल्या तिमाहीत संपूर्ण महाराष्ट्रात ५७० कोटी रुपयांपेक्षा जास्त दाव्यांची (क्लेम्स) परतफेड केली आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांनी या तिमाहीत आरोग्यसेवा वापराचे प्रमुख पॅटर्न दर्शवले, ज्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख नागरी आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाजारपेठांमधील उपचारांच्या गरजांची माहिती मिळते.

# मनपा अधिकारी-कर्मचारी गणेश मंडळाची श्री गणेश प्राणप्रतिष्ठा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने महानगरपालिका मुख्य कार्यालय परिसरात गणेशोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये आणि आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष तथा शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, उपआयुक्त अभय प्रामाणिक, मुख्य उद्यान अधिकारी विजय पाटील, सहायक आयुक्त लता पुजारी, प्रविण कुलकर्णी, अनिल बोंडे, ललित सूर्यवंशी, जितेंद्र खराडकर, संजय रगडे, महेश दुबे, अविनाश निकम तसेच माहिती व जनसंपर्क विभागाचे अतुल बनकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यावेळी 'माझा बाप्पा, स्वच्छतेचा राजा' हा संदेश देण्यात आला. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेला प्राधान्य देत महापालिकेच्या वतीने गणेशोत्सव काळात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे महापौर समीर राजूरकर आणि आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले. तसेच नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

दरम्यान, स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी यावेळी पथनाट्य सादर करण्यात आले. या माध्यमातून स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

# 'समन्वय महर्षी बाळासाहेब नाईक' स्मृतिग्रंथाचे 20 सप्टेंबरला प्रकाशन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून तसेच विश्व हिंदू परिषदेचे परम आदरणीय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कै. बाळासाहेब नाईक यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कार्याचा परिचय करून देणाऱ्या 'समन्वय महर्षी बाळासाहेब नाईक' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन रविवार, २० सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात श्री. दीपक जेवणे लिखित 'स्थितप्रज्ञ' या पुस्तकाचेही प्रकाशन होणार आहे. विश्व हिंदू परिषद, सा. विवेक आणि निर्मलोत्तम सेवा न्यास, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार येथे हा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यास श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास, अयोध्या धामचे कोषाध्यक्ष पूजनीय स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांचे आशीर्वचन लाभणार आहे. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास विश्व हिंदू परिषदेचे संयुक्त महामंत्री स्वामी विज्ञानानंदजी, सहसत्संगप्रमुख दादा वेदक तसेच हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री रमेश पतंगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कै. बाळासाहेब नाईक यांच्या कार्याचा आणि विचारांचा परिचय नव्या पिढीला व्हावा, त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक योगदानातून समाजाला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा स्मृतिग्रंथ प्रकाशित करण्यात येत आहे. त्यांच्या कार्याचा समग्र परिचय या माध्यमातून समाजासमोर येणार आहे.

# मराठवाड्याच्या हक्कासाठी 17 सप्टेंबरला शिवसेनेचे धरणे आंदोलन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढावा, रखडलेली विकासकामे मार्गी लावावीत आणि मराठवाड्याच्या हक्काचा विकास साधावा, या मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी मराठवाडाव्यापी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. 'मराठवाड्याचा विकास... तुमसे ना हो पायेगा!' या घोषवाक्याखाली पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर हे भव्य धरणे आंदोलन होणार आहे. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी मातृभूमी प्रतिष्ठान येथे पक्षाच्या पदाधिकारी व शिवसैनिकांची आढावा बैठक घेण्यात आली.

बैठकीत आंदोलनाचे नियोजन, पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येणाऱ्या जबाबदाऱ्या तसेच कार्यकर्त्यांची उपस्थिती आणि इतर तयारीचा आढावा घेण्यात आला. मराठवाड्याच्या विकासासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

आंदोलनात मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतून पदाधिकारी, शिवसैनिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.

# अपघाताच्या चौकशीत फुटले बिंग! सातारा महामार्गावर कारमधून काळविटाचे मांस जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - सोलापूर-धुळे महामार्गावर घडलेल्या एका किरकोळ अपघाताचा तपास करताना सातारा पोलिसांच्या सतर्कतेमुळे वन्यजीव तस्करीचा एक अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अपघाताच्या नावाखाली वॅगनार कारमधून संरक्षित वन्यप्राण्यांच्या मांसाची विनापरवाना वाहतूक केली जात असल्याचा पर्दाफाश झाला असून, याप्रकरणी चार जणांवर गुन्हा नोंदवण्याची कारवाई सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, १४ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास सातारा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या एसआरपीएफ कॅम्प ग्रुप १४, आयआरबी बटालियन पेट्रोल पंपाजवळ एक अपघात झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सोलापूर-धुळे महामार्गावर एमएच ०२ एल ८९८२ (MH02AL8982) क्रमांकाची कार अपघातग्रस्त झाल्याची माहिती मिळताच सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मारुती खिल्लारे, पोलीस हवालदार राहुल रणवीर आणि पोलीस अंमलदार वैद्य यांचे पथक तात्काळ घटनास्थळाकडे रवाना झाले.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी अपघातग्रस्त वाहनाची आणि परिसराची पाहणी केली. त्यावेळी कारमध्ये उपस्थित असलेला मुस्तफा अकबर कुरेशी (वय २४, रा. सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर) या तरुणाने पोलिसांना माहिती दिली की, तो स्वतः या वाहनात होता आणि त्याच्यासोबत त्याचे इतर तीन मित्र देखील प्रवासात होते. वाहनचालक शफिक सय्यद (वय ३२, रा. बुलढाणा), राजा शेख (वय ४५, रा. सुधाकर नगर, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर) आणि असलाफ नूर कुरेशी (वय २५, रा. आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर) अशी त्या सहकाऱ्यांची नावे असल्याचे त्याने सांगितले. तसेच, अपघातात हे तिघेजण जखमी झाल्याने ते उपचारासाठी आधीच रुग्णालयात गेल्याचेही त्याने पोलिसांना सांगितले.

दरम्यान, प्राथमिक चौकशी सुरू असताना अपघात झालेल्या कारजवळ पोलीस पथकाला एक संशयित गोणी आढळून आली. त्या गोणीमधून बाहेर रक्तासारखा द्रव सांडत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलिसांचा संशय तीव्र झाला. पोलिसांनी तत्परता दाखवत जखमी असल्याचे भासवणाऱ्या मुस्तफा कुरेशी यास ती गोणी उघडून दाखवण्यास सांगितले. मात्र, आपली पोलखोल होणार हे लक्षात येताच मुस्तफाने संधी साधत महामार्गाचा फायदा घेतला आणि पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकून घटनास्थळावरून पळ काढला.

आरोपी पसार झाल्यानंतर पोलिसांचा संशय अधिकच बळावल्याने त्यांनी पंचांसमक्ष ती संशयित गोणी उघडून तपासली. गोणीच्या आतमध्ये प्रत्यक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये अत्यंत संरक्षित मानल्या जाणाऱ्या काळवीट हरिण या वन्यप्राण्याचे मांस असल्याचे स्पष्ट झाले. वन्यप्राण्याचे मांस आढळल्याने प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ संबंधित यंत्रणांना याची कल्पना दिली.

त्यानुसार, पशुवैद्यकीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, महानगरपालिकेचे अवैध कत्तलखाना विरोधी पथक तसेच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ घटनास्थळी पाचारण करण्यात आले. या सर्व संबंधित विभागाच्या तज्ज्ञांसमक्ष जनावराच्या मासाची कसून पाहणी करण्यात आली. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी मासाचे नमुने काढून आपल्या ताब्यात घेतले आहेत.

या संपूर्ण प्रकरणात वाहनचालक शफिक सय्यद, मुस्तफा अकबर कुरेशी, राजा शेख आणि असलाफ नूर कुरेशी या चारही संशयित आरोपींविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. अपघाताच्या या बनावाआडून वन्यजीवांची शिकार व मांस तस्करी केली जात होती का, या दिशेने आता पोलीस आणि वन विभाग संयुक्तपणे सखोल तपास करत आहेत.







मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911